

मासिक

आपली शेती-आपले तंत्र

# कृषि एक्सप्रेस

वर्ष १ ले, अंक ६ वा

जुलै, २०१४

किंमत ४० रुपये, पृष्ठे ६४

## पाणी उपलब्धतेनुसार करूया खरीपातील पिकांचे नियोजन



अभिमानास्पद

# सामाजिक बांधिलकी जपणारा जैन उद्योग समूह

**जैन उद्योग समूहाच्या जागतिक स्तरावरच्या उद्योग-व्यवसायाच्या माध्यमातून या उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन सर्वांना परिचित आहेत. आपल्या अथक आणि अविरत परिश्रमातून त्यांनी आपल्या उद्योग समूहाचा आवाका देशभर सिमीत न ठेवता सातासमुद्रापार पोहचवून जळगावसह खान्देशचे नाव जगाच्या नकाशावर कोरले आहे. हे सर्व करत असताना नव-नव्या आव्हानांना तोंड देऊन आपल्या बुद्धिचातुर्याने त्यावर मात मिळवित यशाचे एक-एक पाऊल पुढे टाकण्यात ते यशस्वी ठरले आहेत. जैन उद्योग समूहाची आजपर्यंतची वाटचाल भूमिपुत्राला निश्चितच दिशादर्शक ठरली आहे. सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण रक्षण हे दोन विषय जैन उद्योग समुहाच्या प्रत्येक धोरणात मुलभूतरीत्या समाविष्ठ आहेत. दरवर्षी नफ्याच्या कमीत कमी पाच टक्के रक्कम सामाजिक कार्यावर खर्च करण्याची तरतुद कंपनीने घटनेत केली आहे.**

भवरलालजी जैन (मोठेभाऊ) यांचे उच्च शिक्षण असतानादेखील त्यांनी कधी कामाची लाज बाळगली नाही. गल्ली-बोळात जाऊन केरोसीन विक्रीचा व्यवसाय त्यांनी सुरुवातीला केला. या व्यवसायवृद्धिसोबतच भरपूर कष्ट आणि जिकरीचे असलेल्या कृषी क्षेत्रात संशोधनातून नवीन काही करण्याचा ध्यास उराशी बाळगून त्यांनी कृषी क्षेत्रात स्वतःला झोकून दिले. दिवस-रात्र शेतीत राबून एक वेळ उपाशी राहणाऱ्या भूमिपुत्राचे जीवनमान उंचविण्यासाठी कृषी क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञानाची नितांत गरज आहे हा मुद्दा हेरुन मोठ्याभाऊंनी कृषी क्षेत्राला प्राधान्य दिले. शेतकऱ्यांच्या समस्यांबद्दल प्राथमिक निदान झाल्यानंतर आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून बियाण्यांपासून ते शेतीसाठी लागणारे खते, औजारे, ट्रॅक्टर्स, प्लास्टिक पाइप, ठिबक अशा कृषिपूरक उत्पादनावर त्यांनी भर दिला.

शेती मशागतीपासून ते थेट उत्पादनापर्यंत येणाऱ्या प्रत्येक बारीक-सारीक गोष्टींचा अभ्यास करत तंत्रशुद्ध पद्धतीचा वापर करुन



**अनिल शिंदे**

प्रसिध्दी विभाग, जैन इरिगेशन
जळगाव. मो.९४०४९५५२४५

कमी श्रमात भरघोस उत्पादन कसे घेता येईल यासाठी संशोधनाच्या माध्यमातून मोठेभाऊ अविरत कार्यमग्न राहिले. जन्मगावी वाकोद येथील स्वतःच्या शेतीत प्रत्यक्षात काम करुन त्यांनी शेती व्यवसाय किती श्रम आणि कष्टाचा आहे याची अनुभूती घेतली. अहोरात्र राबूनदेखील शेवटी सर्वकाही निसर्गावरच अवलंबून असते याचा प्रत्यक्षात त्यांनी अनुभव घेतला. शेतकऱ्यांसोबतच शेतीच्या सखोल अभ्यासातून कृषी क्षेत्रातील जाणाऱ्या शेतीला एका नाळेत गुंफून त्यात सुसूत्रीपणा आणत त्यांनी शेतीचे समीकरण जुळवले.

१९८७ साली जैन इरिगेशन सिस्टिम्स् लि. या कृषीपूरक उद्योग-व्यवसायाच्या माध्यमातून उद्योग उभारणी करुन जागतिक उद्योगविश्वात त्यांनी आपला वेगळा ठसा उमटविला. आपल्या अचाट कार्यकर्तृत्वातून आणि अथक परिश्रमातून साध्य केलेली गर्भश्रीमंती सुखाच्या पायघड्या जरी टाकत पूर्णपणे झोकताना दृष्टीपथास येतो. जैन उद्योग समूहाच्या रुजवातीसोबत संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांनी औद्योगिक जगतात पूर्वापार चालत आलेल्या नोकर-मालकाच्या, रूढ साहेबी संकल्पनेचा पुसटसा पडसाद आपल्या व आपल्यासोबत काम करणाऱ्या सहकाऱ्यांवर पडू नये, यासाठी काळानुरुप नाविन्यपूर्ण कार्यसंस्कृतीही रुजवली. काम आणि कामाच्या व्यवस्थापनाबाबत आदरणीय मोठ्याभाऊंच्या सर्वसमावेश



आपल्या चौघा मुलांसमवेत चर्चेत व्यस्त पद्मश्री डॉ.भवरलाल जैन

अडीअडचणींवर मात करण्याचा त्यांनी ध्यास घेत शेतीपूरक उत्पादनांवर अधिक भर दिला. परंपरागत चालत आलेल्या शेतीच्या ढोबळ पद्धतीत आमुलाग्र बदल करुन कमी श्रमात भरघोस उत्पादनावर फोकस केले. शेतीचे सुधारीत तंत्र अवलंबून नियोजनबद्ध शेती करण्याकडे सुरुवातीपासूनच मोठ्याभाऊंचा विशेष कल होता. यात शेती मशागत पद्धत, पिकपद्धती, पिकाला दिली जाणारी खते, पिकाला गरजेनुसार योग्य मात्रात पाणी अशा सर्व बारीक-सारीक गोष्टींचा विचार केला.

शेतीचा सखोल अभ्यास करुन ढोबळ मानाने केल्या असली तरी त्यात न गुरफटता आपले अवघे जीवन अंगी बाणलेल्या ध्येयांना समर्पित करणारे हे असामान्य व्यक्तीमत्व यशाने कधी हुरळून गेले नाही. उद्योगाच्या माध्यमातून समोर येणारी अनेक भव्य-दिव्य आव्हाने पेलणाऱ्या जैन उद्योग समूहाच्या जागतिक यशामागे अविरत झटणारे, श्रमणारे, प्रयत्नांची पराकाष्ठा करणाऱ्या अनेक हातांचा खारीचा वाटा आहे. दीर्घ अनुभवाचे संचित पाठीशी घेऊन आजमितीस देखील तेवढीच आव्हाने तेवढ्याच आत्मविश्वासाने पेलणारा जैन परिवारातील प्रत्येक घटक कशाचीही तमा न बाळगता मनी बाळगलेल्या ध्येयाप्रती स्वतःला असलेली कार्यसंस्कृतीची संकल्पना पारदर्शी स्वरुपाची ठरली आहे. कार्यसंस्कृतीच्या आधारावर मोठ्याभाऊंनी परिवारातील घटकांवर सोपविलेली वेगवेगळी जबाबदारी प्रत्येक घटक आपले कसब पणाला लावून अगदी उत्कृष्टरित्या पार पाडत आहेत.

समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या उदात्त हेतूने जैन उद्योग समूहाने सामाजिक बांधिलकीला सदैव अग्रस्थानी ठेवून ङ्गभवरलाल ॲण्ड कांताबाई जैन मल्टीपर्पज फाऊंडेशनफ व ङ्गगांधी रिसर्च फाऊंडेशनच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रमांना अग्रक्रम दिला आहे. याच





माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात या उद्योग समूहाचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे.

**शैक्षणिक क्षेत्रातील सक्रिय सहभाग**

जैन उद्योग समुहाच्या माध्यमातून विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जातात अथवा इतरांच्या उपक्रमात जैन उद्योग समूह सहभागी होतो. अनेक गरजू शिक्षण संस्थांना नेतृत्वात अनुभूतीचे संकूल उभे राहीले आहे. अनुभूती १, अनुभूती २ आणि आता अनुभूती ३ या प्रकल्पांचे काम मोठ्याभाऊंच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

**वैद्यकिय क्षेत्रातले अनोखे प्रयोग**

शैक्षणिक क्षेत्रासोबतच सर्व सामान्यांच्या आरोग्याकडे लक्ष देण्याचा प्रकल्पही जैन उद्योग समूहाच्या चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून चालवला जातो. यातून आहे. अगदी प्रथम जैन ब्रदर्स असताना, जळगाव शहरातील चौकांच्या नुतनीकरणाचे आगळे वेगळे काम करण्यात आले होते. काव्यरत्नावली चौकाचे सुशोभिकरण करताना प्रासंगिकतेचा समन्वय साधून दरवेळेस नव-नवीन संकल्पनातून हा चौक सुशोभित करण्यात येत असतो. कधीकाळी रात्री निर्जन वाटणारा हा चौक आता लोकांच्या गर्दीने




विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करताना उद्योग समूहाचे उपाध्यक्ष अशोकभाऊ जैन समवेत फारुख शेख, विजय वाणी आदी.

शालेय साहित्य, विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त साहित्य यासाठी आर्थिक मदत दिली जाते. याच धोरणाचा भाग म्हणून गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती दिली जाते. किमान सरासरी ४५० ते ५०० विद्यार्थी याचा लाभ घेतात. शिक्षण क्षेत्रात गुणवत्तेच्या जोरावर लक्षवेधी प्रगती करू शकेल असा अंदाज असलेल्या विद्यार्थ्यांच्या संपूर्ण शिक्षणाचा भारदेखील जैन उद्योग समूहाने उचललेला आहे. काही विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्चासाठी दत्तक घेतले जाते. ग्रामीण विद्यार्थी नव्या शैक्षणिक वातावरणात टिकले पाहिजेत, त्यांना बाहेरील स्पर्धेचा अंदाज आला पाहिजे म्हणून इतर संस्थांच्या सहकार्याने प्रशिक्षण शिबिरे, स्पर्धा परीक्षा नियमितपणे घेतल्या जातात. शैक्षणिक क्षेत्रात मोठ्याभाऊंच्या गरजुंना आरोग्यसेवा मिळावी हाच हेतू असतो. विविध संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागात वैद्यकिय शिबिरे घेतली जातात. सामान्य लोकांच्या सोबतच कंपनीतील किमान आठ हजार कर्मचाऱ्यांच्या आरोग्याप्रतीही सजगता पाळली जाते. त्यांचीही नियमित आरोग्य, नेत्र, हृदय आदी तपासणी होत असते. सहकाऱ्यांना, त्याच्या कुटुंबाला मेडिक्लेमचे संरक्षण आणि लाभ मिळवून देण्याकडे कंपनी कटाक्षाने लक्ष देत असते. सहकाऱ्यांना काही आजारांवरील उपचारांसाठी कंपनी आर्थिक मदत करते.

**बहुविध सांस्कृतिक संपन्नता**

सामाजिक बांधिलकी म्हणून अगदी सुरवातीपासून जैन उद्योग समुह सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन, नियोजन करत आला सायंकाळपासून रात्री उशीरापर्यंत फुलतो. त्यात वृद्ध असतात, महिला असतात आणि कॉलेजची तरुणाई सुध्दा असते. सांस्कृतिक उपक्रमांचे नियोजन करताना पूर्णतः भारतीय संस्कृती प्रदर्शन आणि संवर्धन यावर लक्ष दिले जाते. जळगावमध्ये होणाऱ्या बालगंधर्व महोत्सवास कंपनीने सातत्याने सहकार्य केले. खान्देशकन्या बहिणाईच्या राहत्याघरी संग्रहालय निर्मितीसाठी पुढाकार, चाळीसगावचे जगप्रसिद्ध छायाचित्रकार केकी मूस यांच्या नावाने असलेल्या विश्वस्त मंडळासोबत छायाचित्र स्पर्धा, स्थानिक कलावंताचे कला प्रदर्शन, त्यांच्या कलेची खरेदी असेही उपक्रम जैन उद्योग समूह दरवर्षी राबवित असतो.

क्रीडा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान जैन उद्योग समूहाच्या

विस्ताराच्या प्रत्येक टप्प्यावर क्रिडा विषयक उपक्रमांचे विविध खेळांसह क्षेत्रही विस्तारले आहे. राष्ट्रीय व आंतराष्ट्रीयस्तरावर क्रिडापटूंना व्यासपिठ उपलब्ध करुन त्यांना प्रशिक्षण, मार्गदर्शन, आर्थिक सहकार्य आणि प्रसंगी नोकरी देण्याचेही निर्णय कंपनीने घेतले आहेत. जैन उद्योग समुहाच्या माध्यमातून आज १४-१५ खेळांकडे लक्ष दिले जाते आहे. यात बुद्धीबळ, टेबलटेनिस, क्रिकेट, बॅडमिंटन आदी खेळांचा समावेश आहे. विविध प्रकारच्या प्रशिक्षण योजनांमधून खेळाडू लाभ घेत आहेत. क्रिडामध्ये आपली काही धोरणे निश्चित आहेत. जैन स्पोर्टस्च्या माध्यमातून गेल्या काही वर्षांत क्रिकेटमध्ये लक्षवेधी काम केले आहे. आयपीएल संघात जाण्याची मजल खेळाडुंनी मारली आहे.

सामाजिक बांधिलकीचे इतर विषय

जैन उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. भवरलालजी जैन (मोठेभाऊ) यांच्यावर महात्मा गांधींजीच्या शिकवण व विचारांचा मोठ्ठा प्रभाव आहे. यामुळेच कुटुंबावर व कंपनीवरही गांधीजींच्या विचारांचा प्रभाव होणे स्वाभाविकच आहे. गांधीतीर्थची निर्मिती म्हणजे भाऊंनी जपलेल्या दिर्घकालीन स्वप्नांची पुर्तता आहे. गांधीतीर्थ निर्मितीमागे दोन महत्वाचे उद्देश म्हणजे गांधीजींचे विचार शिकवणीला पुढे ३००-४०० वर्षे जीवंत ठेवण्याचा प्रयत्न तसेच गांधीजींचे सामान्यपण लोकांसमोर मांडून सामान्यांना गांधीजींच्या विचार व शिकवणीकडे आणण्याचा प्रयत्न आहे. गांधीतीर्थ निर्माण करतांना भाऊंनी मोठे परिश्रम घेतले आहे. तरूणाईला आर्कषित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञानाचाही उपयोग यात केलेला आहे. गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या माध्यमातुन गांधी विचारधारेवर आधारीत परीक्षा घेतो. यात लाखांवर विद्यार्थी सहभागी होतात. तसेच मोहन ते महात्मा फिरते चित्र प्रदर्शन विविध संस्थामध्ये घेऊन जातो जसे की शाळा, तुरूंग इत्यादी. सामाजिक बांधिलकीचा हा वसा असाच निरंतर सुरू राहील यात शंका नाही. ■

---

# जैन इरिगेशनला हिमाचल प्रदेशमधील एकात्मिक सिंचन प्रकल्पाचे काम बहाल

**जळगाव (प्रतिनिधी)**- एकात्मीक ठिबक सिंचन प्रकल्पात अग्रगण्य असलेल्या व सूक्ष्मसिंचनात जागतिक पातळीवर नेतृत्व करणाऱ्या जैन इरिगेशन सिस्टिम्स्ला हिमाचल प्रदेश सरकारने सुमारे ९७.५२ कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पाचे काम बहाल केले आहे. पर्वत रांगात विखुरलेल्या हिमाचल प्रदेशच्या कृषीक्षेत्रासाठी जैन इरिगेशनने आपल्या अभियांत्रिक कौशल्याच्या सहाय्याने यापूर्वीही बल्ह घाटी प्रकल्प साकारुन तेथील शेतकऱ्यांना प्रगतीचा मंत्र दिला आहे. हमिरपूर जिल्ह्यातील हा नवा प्रकल्प तेवढाच आव्हानात्मक असून या प्रकल्पाद्वारे ११ हजार ९०० एकर कृषी क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार आहे. पहाडी क्षेत्रासाठी एकात्मीक सूक्ष्मसिंचन प्रकल्पाची ही एकमेवाद्वितीय संकल्पना या प्रकल्पासाठी वापरण्यात येणार असून अशा प्रकारचा जगातील हा आगळा प्रकल्प ठरेल.

सूक्ष्मसिंचन क्षेत्रातील आजवरचा तांत्रिक अनुभव व अभियांत्रिकी कौशृल्य, याला संशोधन व विकासाची दिलेली जोड, रचना आदीच्या बळावर जैन इरिगेशनने या प्रकल्पासाठी आपला दावा सिद्ध केला. या सूक्ष्मसिंचन प्रकल्पात सुमारे ५५० किलोमीटर अंतराचे पाइप लाईनचे जाळे, १० हजार अश्वशक्तीचे सुमारे २५ ते ३० पंप, याचे इन्स्टॉलेशन, परिक्षण आदी जबाबदारी जैन इरिगेशनने स्वीकारली असून या प्रकल्पाचे ५ वर्ष देखभालही जैन इरिगेशन करेल. हा प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी २४ महिन्यांचा निर्धारित केला आहे. हिमाचल प्रदेशच्या कृषीक्षेत्रात हा प्रकल्प व्यापक परिवर्तन घडवून आणणारा असून याच धर्तीवर इतर क्षेत्रासाठीही हा प्रकल्प मार्गदर्शक ठरेल.

या प्रकल्पासाठी आमची उत्सुकता होती. हा प्रकल्प जैन इरिगेशनला बहाल झाल्याने आम्ही प्रसन्न असून हिमाचल प्रदेशसारख्या राज्यातील छोट्या शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी काम करताना आम्हाला निश्चितच आनंद आहे. या प्रकल्पातून केवळ पाण्याचीच बचत साध्य होणार नाही, तर यासमवेतच कृषी उत्पादनात वाढ व शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नाला हातभार लागणार असल्याचे जैन इरिगेशनचे सहव्यवस्थापकीय संचालक अतुल जैन यांनी सांगितले. जैन इरिगेशनजवळ अशा प्रकारचे मोठे प्रकल्प उभे करण्यासाठी सर्व तंत्रकुशलता असून विदेशातील आमचा अनुभवही आम्ही यासाठी लावू. हा प्रकल्प हिमाचल प्रदेश सरकारचा दिशादर्शक प्रकल्प म्हणून ओळखला जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले.

**ठळक वैशिष्ट्ये -**

- प्रकल्पाची किंमत ९७.५२ कोटी रुपये.
- हमिरपूर जिल्ह्यातील नादोन तहसिल क्षेत्रात साकारेल प्रकल्प.
- ३० हजार शेतकरी/ लाभार्थी व ११ हजार नऊशे एकर क्षेत्राला होईल सिंचनाचा लाभ.
- १४ पंचायतींना मिळणार आश्वासक मार्ग.